# विभागीय आयुक्त कार्यालय (विधानभवन) पुणे विभाग, पुणे
## (निवाडा शाखा)

ई-मेल :- tp1niwadapunedivn@gmail.com

जा.क्र.विआपुणे/निवाडा/नागरिकांची सनद/६५ /२०२४

दिनांक : १४/०६/२०२४

प्रति,
मा. उपायुक्त(सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, पुणे.

**विषय :-** **नागरिकांची सनद संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत**
**संदर्भ :-** आपल्या कार्यालयाकडील पत्र क्र.साप्र/२/आरआर/२१९/२०२४, दि.२४/०४/२०२४

महोदय,

उपरोक्त विषयाकामी संदर्भिय पत्रास अनुसरुन सादर करणेत येते की, निवाडा शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे या कार्यालयाकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवाबाबत खालील विहीत नमुन्यात सनद तात्काळ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करणेत येत असनू कार्यालयाच्या दर्शनी भागावर यापूर्वी प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर माहिती अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

आपली विश्वासू,

(श्वेता पवार)
नगर रचनाकार
(निवाडा शाखा)
विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे.

प्रत- श्री. सुहास चटणे, व.सहा.

निवाडा शाखेशी संबंधित नागरिकांची सनद सोबत जोडणेत आलेली असून सदर सनद कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही तात्काळ करणेत यावी.

## निवाडा शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे

## नागरिकांची सनद

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी व कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | भूमीसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ११ खाली प्राप्त होणाऱ्या प्रारुप निवाडयांना शासनाने दिलेल्या वित्तीय मर्यादेनुसार मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यकक्षेत असतील तर त्यास मंजूरी/नामंजूरी देणे व अधिकार मर्यादेवरील निवाडयांची छाननी करुन मंजूरीसाठी शासनाचे महसूल व वन विभागाकडे सादर करणे | नगर रचनाकार व सहायक नगर रचनाकार, निवाडा शाखा | संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय व भूसंपादन अधिकारी यांचेकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर ४५ दिवस | मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे |
| २ | सानुग्रह अनुदान प्रस्तावांना शासनाने दिलेल्या वित्तीय मर्यादेनुसार मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यकक्षेत असतील तर त्यास मंजूरी/नामंजूरी देणे व अधिकार मर्यादेवरील निवाडयांची छाननी करुन मंजूरीसाठी शासनाचे महसूल व वन विभागाकडे सादर करणे | नगर रचनाकार व सहायक नगर रचनाकार, निवाडा शाखा | संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय व भूसंपादन अधिकारी यांचेकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर ४५ दिवस | मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे |

नगररचनाकार, निवाडा शाखा
विभागीय आयुक्त कार्यालय
पुणे विभाग, पुणे.